# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २० जुलै २००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

मंगळवार दिनांक २०.७.२००४ रोजी मा.महापौर सौ.रूख्मीणी राधाकिशन शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह '' येथे दुपारी १.०० वाजता ''वंदेमातरम '' या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
०२. स.स.श्री .घोडेले नंदकुमार राधाकिसन
०३. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
०४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
०५. स.स.श्री.वाणी ठकूजी रामसिंग
०६. स.स.श्री.औताडे रावसाहेब ममतू
०७. स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी
०८. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
०९. स.स.श्री.राजू रामराव शिंदे
१०. स.स.श्री.कावडे साहेबराव राणूबा
११. स.स.सौ.पवार मंदाबाई प्रभाकर
१२. स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१३. स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
१४. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१५. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोंखडे
१६. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१७. स.स.श्रीमती डॉ.आशा बिनवडे
१८. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१९. स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मण
२०. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
२१. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२२. स.स.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२३. स.स.श्री.राजेंद्रसिंग जबिंदा
२४. स.स.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे
२५. स.स.श्री.नजर हमीद अ.गफ़ुर
२६. स.स.श्री.शे.खाजा शे.शरफ़ोद्दीन
२७. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
२८. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
२९. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडूरंग
३०. स.स.श्री.डॉ.भागवत किसनराव कराड
३१. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर

३२. स.स.श्री.मगरे सुनिल यादवराव
३३. स.स.शिंदे किशोर रावसाहेब
३४. स.स.श्री.अ.कादर अ.हफ़ीज
३५. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
३६. स.स.श्री.नासेरखॉन सरदारखॉन
३७. स.स.श्री.मोहम्मद जावेद मोहम्मद इसहाक
३८. स.स.सौ.खरात कुसूमबाई दौलत
३९. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब
४०. स.स.सौ.नुसरत बानो फ़िरोजखान
४१. स.स.सौ.मोरे जयश्री कुमारराव
४२. स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
४३. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
४४. स.स.श्री.पारे सोपान भाऊराव
४५. स.स.सौ.विमलताई भिकनसिंग राजपूत
४६. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४७. स.स.श्री.अ.कदिर मौलाना सय्यद
४८. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजूरकर
४९. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
५०. स.स.श्री.राधाकृष्ण गायकवाड
५१. स.स.सौ.संगिता बाळू मैंद
५२. स.स.श्री.रणधीरसिंग होलिये
५३. स.स.श्री.नासीरखान अ.रहेमान खान कुरैशी
५४. स.स.श्रीमती शाहीन जफ़र महेमुद ज़फर
५५. स.स.श्री.जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५६. स.स.सौ.चंद्रभागाबाई दाणे
५७. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
५८. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
५९. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
६०. स.स.सौ.सिद्दीकी नईम सुलताना म.फ़सियोद्दीन
६१. स.स.श्री.अफसरखान यासीनखान
६२. स.स.सौ.सुलताना बेगम चाँद खॉ
६३. स.स.श्री.कै सर खान बद्रोद्दीन खान
६४. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
६५. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६६. स.स.सौ.बबिता सुभाष कागडा
६७. स.स.सौ.निखत परविन एजाज अली

**(नामनिर्देशित पालिका सदस्य )**

०१. स.स.श्री.भगवान देविदास घडमोडे
०२. स.स.श्री.सुरजितसिंग खुंगर
०३. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
०४. सौ.सलमा बानो मीर मोहम्मद अली

**संवाद:**

श्री. किशनचंद तनवाणी : स.सदस्य श्री.राजेंद्रसिंग जबिंदा यांचे वडील स्व.तारासिंग जबिंदा यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे. तसेच श्री.जयवंत ओक यांचे काका स्व.पांडुरंग सखाराम टाकळे यांचेही दु:खद निधन झाले त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.संजय सिरसाट : यास माझे अनुमोदन आहे.

श्री.भागवत कराड : श्री.जबिंदा पोटनिवडणूकीत विजयी झाले प्रथमत: सभागृहात आले त्यांचे स्वागत व अभिनंदन करावे तसेच श्री.तनवाणी यांची सभागृह नेता म्हणून पहिलीच सभा आहे त्यांचे अभिनंदन करावे.

मा.महापौर : ठिक आहे. श्रध्दांजलीसाठी सर्वांनी उभे राहावे.

(याच वेळी सभागृहात स्व.तारासिंग जबिंदा तसेच स्व.पांडुरंग सखाराम टाकळे यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री.संजय सिरसाट : स.सदस्य श्री.तनवाणी किशनचंद यांची या महापालिकेच्या सभागृहनेता पदी नियुक्ती झाली तसेच पोटनिवडणूकीत श्री.राजेंद्रसिंग जबिंदा हे उस्मानपुरा वार्डातून नव्यानेच विजयी झाले या दोघांचेही सभागृहातर्फे अभिनंदन करून स्वागत करण्यात यावे.

श्री.भागवत कराड : यास माझे अनुमोदन आहे.

(याच वेळी सभागृहनेता तथा स.सदस्य श्री.तनवाणी किशनचंद तसेच नुतन स.सदस्य श्री.राजेंद्रसिंग जबिंदा यांचे पुष्पगुच्छ देऊन सभागृहातर्फे मा.महापौर स्वागत करतात.)

श्री.राधाकृष्ण गायकवाड : आज ज्या पध्दतीने सभागृह नेता पदी श्री.तनवाणी किशनचंद यांची निवड झाल्याबद्दल स्वागत करण्यात आले हीच प्रथा पुढे चालु ठेवून ज्या ज्या पदाधिकाऱ्यांची निवड होईल त्यांचे या सभागृहातर्फे यापुढे स्वागत करण्यात यावे.

श्री.मीर हिदायत अली : बीड बायपास येथील जकात नाक्यावरील दोन वाहन प्रवेश पुस्तीका गहाळ झालेल्या आहेत. त्यात जे कर्मचारी दोषी असतील त्यांना निलंबीत करण्यात आलेले नाहीत. त्यावर चर्चा करण्यात यावी. त्यांनी गुन्हा कबूल केला आहे. दोन पुस्तके गायब झाली आहे. त्यानंतर विषय पत्रिकेला सुरूवात करावी.

श्री. किशनचंद तनवाणी : अगोदर विषय पत्रिका घेण्यात यावी त्यानंतर जनरल चर्चा घेण्यात यावी. चर्चेसाठी वेळ देण्यात यावा.

श्री.मीर हिदायत अली : इतरांना निलंबित केले. यांना का नाही. दबावाखाली काम करतात. अन्यथा ज्यांना निलंबित केले त्या सर्वांना परत घ्यावे.

मा.महापौर : अगोदर विषय पत्रिकेवर चर्चा करावी त्यानंतर जनरल चर्चेसाठी वेळ दिला जाईल.

(याच वेळी मा.महापौर यांचे डायससमोर अगोदर चर्चा करावी म्हणून बरेच स.स.मोठमोठ्याने मागणी करतात काहीही ऐकावयास येत नाही.)

श्री.आनंद तांदुळवाडीकर : विषय पत्रिका अगोदर घेण्यात यावी. नंतर चर्चा घ्यावी.

श्री.मो.जावेद मो.इसहाक : दोन पुस्तके गायब झालेली आहे. जे दोषी असतील त्यांना निलंबीत करावे. त्यानंतर कार्यवाही करण्यात यावी. यापूर्वी असे प्रकार झालेले होते. त्या कर्मचाऱ्यांना निलंबीत केलेले आहे.

श्री.मीर हिदायत अली : यापूर्वी ज्या कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार केला प्रकरणे उघडकीस आलेली होती त्यांना निलंबीत करण्यात आलेले आहे. काही लोकांवर पोलिस गुन्हा दाखल

करण्यात आले. या कर्मचाऱ्यांवर निलंबणाची कार्यवाही न करता बदल्या करण्यात आलेल्या आहे असे का खुलासा करावा.

श्रीमती शाहीन जफ़र : अगोदर निलंबीत करावे त्यानंतर कार्यवाही करण्यात यावी.

मा.महापौर : एका वेळेस एकाच स.सभासदांनी बोलावे. सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री.प्रकाश निकाळजे : मा.महापौर या कर्मचाऱ्यांना पाठीशी घालीत आहे. यापूर्वी झोन क्र.७ मध्ये पावती पुस्तके गहाळ झालेली होती त्या कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आलेले होते. काही कर्मचाऱ्यांवर पोलिस गुन्हा दाखल करण्यात आले त्यांना पोलिस कस्टडी झालेली आहे. त्या कर्मचाऱ्यांप्रमाणे जकात विभागातील बीड नाक्यावर दोन वाहन प्रवेश पावती बुक गहाळ झालेले आहे. त्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या ही शिक्षा होत नाही. त्यांना निलंबीत करावयास पाहिजे होते त्यानंतर चौकशी होणे आवश्यक होते.

मा.महापौर : अगोदर विषय पत्रिका घेण्यात येईल. त्यानंतर चर्चा करण्यास वेळ दिला जाईल.

श्री.मीर हिदायत अली : विषय सर्व मंजूर करावे हरकत नाही. परंतु जनरल चर्चा अगोदर घेण्यात यावी. ज्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या काळात पुस्तके गायब झाली त्यांना निलंबीत का करण्यात आलेले नाही. या कर्मचाऱ्यांवर पोलिसात गुन्हा दाखल का केलेले नाही. माजी उपमहापौर यांनी पत्रही दिलेले आहे. उत्तर मिळालेले नाही कार्यवाही झालेली नाही. गंभीर बाब आहे. मा.आयुक्तांनी दखल घ्यावी.

(याच वेळी मा.महापौर डायस समोर बरेच स.सभासद जाऊन मोठमोठ्याने चर्चेसाठी मागणी करतात व मोठमोठ्याने बोलतात. काहीही ऐकावयास येत नाही.)

मा.महापौर : विषय पत्रिकेला सुरूवात करण्यात येते.

**<u>विषय क्र. ३६६/१ :</u>**

दिनांक २६.०५.२००४, ३१.०५.२००४, १९.०६.२००४ (कार्यक्रम पत्रिका क्र.३२) आणि दि.१९.०६.२००४ (कार्यक्रम पत्रिका क्र.३९) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.किशनचंद तनवाणी : विषय पत्रिकेला सुरूवात करावी नंतर चर्चेसाठी वेळ देण्यात यावा. विषय क्र.३१८/२ सह इतिवृत्त कायम करावे.

मा.महापौर : विषय क्र.१ दुरूस्तीसह मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

दिनांक २६.०५.२००४, ३१.०५.२००४, १९.०६.२००४ (कार्यक्रम पत्रिका क्र.३२) आणि दि.१९.०६.२००४ (कार्यक्रम पत्रिका क्र.३९) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे व विषय क्र.३१८/२ सह इतिवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत आली.

(याच वेळी पुन्हा मा.महापौर डायससमोर स.सभासद जमा होतात व चर्चेची मागणी करतात.काहीही ऐकावयास येत नाही.)

श्री.मो.जावेद मो.इसाक : अगोदर चर्चा घेण्यात यावी त्यानंतर विषय पत्रिका घेण्यात यावी.

(याच वेळी सभागृहात जकात अधिक्षक यांचे संदर्भात बॅनर दाखविले जाते.)

श्री.भगवान घडमोडे : असे सभागृहात बॅनर्स दाखवून एखादे अधिकारी चांगले काम करीत असेल तर त्यांचे खच्चीकरणे होता कामा नये. म्हणून मी याचा निषेध व्यक्त करतो.

श्री.मीर हिदायत अली : संबंधीत कर्मचाऱ्यांना अगोदर निलंबीत करण्यात यावे त्यानंतर सभेचे कामकाज चालवावे. सदर कर्मचाऱ्यांनी गुन्हा कबूल केलेला आहे. पैसे भरण्यास

तयार आहे. निलंबीत करून गुन्हा दाखल करावा. नुसत्या बदल्या करण्यात येवू नये.

श्री.भगवान रगडे : चर्चा अगोदर घेण्यात यावी. त्यानंतर विषयपत्रिका घेण्यात यावी. सभागृहाचा वेळ वाया जाता कामा नये.

**विषय क्र. ३६७/२ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.प्रधान सचिव, पा.पु.व स्व.वि.यांचे शासन निर्णय क्र.डब्ल्युक्युएम/२००३/प्र.क्र.९०/पा.पु.१२ दि.०८.१०.०३ नुसार, पाणी शुध्दीकरणासाठी ब्लीचींग पावडर व्यतिरिक्त कमी खर्चात पाण्याच्या टाकीजवळच,द्रवरूप क्लोरीन व इतर द्रावणे तयार करणारी सयंत्रे (यंत्र) बसवुन,पाणी शुध्दीकरण करावे असे निर्देश दिलेले आहेत.

महाराष्ट्र शासन,परिपत्रक क्र.टी.ए.सी.२००३/प्र.क्र.४१/पा.पु.१२ दि.३०.०४.०३ मध्ये इलेक्ट्रॉलीसीस पध्दतीने मिठ व पाण्याचा वापर करून,पाणी शुध्दीकरणासाठी लागणारे ‘सोडीयम हायपोक्लोराईट ’ तयार करणारी यंत्रणा ‘सिक्लोर मॅक इलेक्ट्रोक्लोरीनेशन सिस्टीम‘ यांचे नाम निर्देशित केले आहे. त्यांनी सदरील सयंत्र विकसीत केले आहे. त्यानुसार,औरंगाबाद मनपा (पा.पु.) विभागांतर्गत, क्रांतीचौक व सिडको येथे सिक्लोर मॅक १००० व ३००० क्षमतेचे सयंत्रे बसविणे प्रस्तावित आहे, म्हणजे (post chlorination) द्वारे, पाणी शुध्दीकरण करता येईल.

सदरील सयंत्रे बसविण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळातर्फे १००% अनुदान विशेष निधीमधुन प्राप्त होत असल्यामुळे मा.आयुक्त महानगरपालिका यांनी पत्र क्र.काअ/पापु/१५६ दि.१३.२.०४ द्वारे मा.अध्यक्ष,मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला निधी उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली होती, त्यानुसार मराठवाडा वैधानिक विकास मंडळातर्फे प्र.क्र.मवैविम/वि.नी.०४-०५/२००४/३२८/ दि.१६ जून ०४ द्वारे रू.५२.९० लाख इतका निधी वरील कामासाठी उपलब्ध करून देणे बाबत मा.प्रधान सचिव नगर विकास विभाग मंत्रालय,मुंबई यांच्याकडे प्रस्तावित केले आहे. त्यामूळे ही रक्कम १००% शासनाकडून मिळणार असल्याने म.न.पा.फंडातून खर्च करण्याची आवश्यकता नाही.

तरी रू.५२.९० लाख रूपयांच्या अंदाजपत्रकास मान्यता झाल्यास निधी उपलब्ध करून देणेबाबत मा.प्रधान सचिव,नगर विकास, मंत्रालय, मुंबई यांना पत्रव्यवहार करण्यात येईल व निधी उपलब्ध झाल्यानंतर सिडको एन-५,तसेच क्रांतीचौक येथील टाक्यांजवळ मिठ आणि पाणी यांच्या द्रावणापासून सोडियम हायपोक्लोराईट द्वारे पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्याची यंत्रणा शासन निर्णय क्र.टी.ए.सी.२००३/प्र.क्र.४१/पापु १२,मंत्रालय,मुंबई - दि.३०.०४.०४ अन्वये राज्यस्तरीय अनुसुची मध्ये (पॅनल) समावेश असलेल्या सिक्लोर मॅक इलेक्ट्रोक्लोरिनेशन सिस्टीमद्वारे उभारण्यात येईल. तरी कृपया प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : विषय क्र.२ मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे, पाणी पुरवठा शुध्दीकरणासाठी ब्लिचींग पावडर व्यतिरिक्त कमी खर्चात पाणी शुध्दीकरण करण्यासाठी शासन निर्देश मा.प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे शासन निर्णय क्र.डब्ल्युक्युएम/२००३/प्र.क्र.९०/पा.पु.१२ दि.०८.१०.०३ नुसार, पाण्याच्या टाकीजवळ द्रवरूप क्लोरीन व इतर द्रावणे तयार करणारी सयंत्रे (यंत्र) बसवून, पाणी शुध्दीकरण करणे, त्यासाठी आवश्यक १००% निधीच्या उपलब्धते साठी मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठपुरावा करण्यास व निधी प्राप्ती नंतर सिडको एन-५ व क्रांतीचौक जलकुंभ येथे सिक्लोर मॅक १००० व ३००० क्षमतेचे सयंत्रे बसविणे. या करीता शासन निर्णय क्र.टी.ए.सी.२००३/प्र.क्र.४१/पापु-१२,मंत्रालय,मुंबई दिनांक ३०.०४.२००४ अन्वये राज्यस्तरीय अनुसूची मध्ये (पॅनल) समावेश असलेल्या सिक्लोर मॅक इलेक्ट्रोक्लोरिनेशन सिस्टीमद्वारे उभारणी

करण्यासाठी रूपये ५२.९० लक्ष अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.चंद्रशेखर जैस्वाल : कोणत्या विषयावर चर्चा चालू आहे कळायला मार्ग नाही. सर्व सदस्यांना जागेवर बसण्या बाबत सुचना कराव्यात.

श्री.मीर हिदायत अली : विषयपत्रिका नंतर घेण्यात यावी. चर्चेला सुरूवात करावी.

श्री.राजेंद्रसिंह जबिंदा : विषय क्र.२५ पुन्हा डांबरीकरणाच्या शिल्लकीतून किंवा सुधारीत अर्थसंकल्पातून करावे. निविदा काढावी.

मा.महापौर : विषय पत्रिकेवरील विषय क्र.६ व २४ सोडून उर्वरीत सर्व प्रस्तावास व ऐनवेळचे प्रशासनाचे ३ व स.सदस्यांचे सर्व प्रस्तावास दुरूस्तीसह,स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. चर्चेला सुरूवात करावी.

**<u>विषय क्र. ३६८/३ :</u>**

कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की,औरंगाबाद पाणी पुरवठा योजना ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडून महानगरपालिकेकडे दिनांक ०१.०४.१९९८ पासुन हस्तांतरीत झालेली आहे. सदर योजना हस्तांतरणाच्या वेळेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे चार स्थापत्य अभियंते, एक स्थापत्य उप अभियंता, एक यांत्रिकी उप अभियंता,एक यांत्रिकी कनिष्ठ अभियंता तसेच एक विद्युत कनिष्ठ अभियंता प्रतिनियुक्तीवर पाणी पुरवठा योजना चालविण्या करीता महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर घेण्यात आले होते. त्यापैकी उप अभियंता,(स्थापत्य) व उप अभियंता,(यांत्रिकी) हे सेवा निवृत्त झालेले असून,श्री.जी.बी.जावळे यांना दिनांक १२.०२.२००३ रोजी उप अभियंता या पदावर पदोन्नती मिळाल्याने सेवा निवृत्त झालेल्या एक उप अभियंता (स्थापत्य) यांच्या जागी त्यांची नेमणूक करण्यात आली व उप अभियंता (यांत्रिकी) या रिक्त जागी महानगरपालिका आस्थापनेवरील श्री.शिरसाठ यु.जी.(सहा.अभियंता) यांची नेमणूक केली आहे. तसेच श्री.जावळे यांची नेमणूक उप अभियंता (स्थापत्य) या पदावर केल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या शाखा अभियंता पदावर एक वर्षासाठी श्री.के.पी.धांडे (शाखा अभियंता) यांना दिनांक ०८.०७.२००३ पासुन प्रतिनियुक्तीवर महानगरपालिका सर्व साधारण सभा दिनांक २०.०८.२००३ ठराव क्रमांक ११२/३ अन्वये महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर घेण्यांत आलेले आहे. श्री.धांडे यांच्या प्रतिनियुक्तीची मुदत दिनांक ०८.०७.२००४ रोजी संपत आहे. त्यामुळे त्यांना पुढील दोन वर्षा करीता मुदत वाढ देण्यासाठी मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी मान्यता दिली आहे. तसेच औरंगाबाद पाणी पुरवठा योजना चांगल्या पध्दतीने चालविल्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील खालील अभियंत्याच्या सेवेची पुढील एक वर्षासाठी महानगरपालिकेस आवश्यकता आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.पी.ढवळे | शाखा अभियंता,स्थापत्य | दि.०१.०४.९८ पासुन प्रतिनियुक्तीवर कार्यरत |
| २. | श्री.आर.ए.गोसावी | कनिष्ठ अभियंता,स्थापत्य | ----'---- |
| ३. | श्री.एन.बी.वाघमारे | शाखा अभियंता,स्थापत्य | ----'---- |
| ४. | श्री.डी.आर.गवई | शाखा अभियंता,यांत्रिकी | ----'---- |
| ५. | श्री.सी.एल.राठोड | कनिष्ठ अभियंता,विद्युत | ----'---- |

उपरोक्त अभियंत्यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी मध्ये महानगरपालिकेच्या अभियंत्यांची नेमणूक औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवर करून त्यांना एक वर्षाच्या कालावधीमध्ये प्रशिक्षित करण्यात येईल व त्यानंतरच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मधुन प्रतिनियुक्तीवर आलेल्या अभियंत्यांना परत पाठवता येईल. या करीता महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मागणी करण्यात आलेले स्थापत्य,यांत्रिकी व विद्युत शाखेतील अभियंत्यांची तात्काळ नेमणूक होणे आवश्यक आहे. जेणे करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अभियंत्यांसमवेत काम करून त्यांना योजनेची माहिती घेता येईल व त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंते परत पाठविता येतील.

तरी श्री.के.पी.धांडे यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक ०८.०७.२००६ पर्यंत व इतर अभियंत्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक ३०.०६.२००५ पर्यंत वाढवुन मिळण्याकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामध्ये दि.०१.०४.१९९८ पासून हस्तांतरीत झालेले अभियंते तसेच दि.२०.०८.२००३ ठराव क्र.११२/३ नुसार प्रतिनियुक्तीवर घेण्यांत आलेले श्री.के.पी.धांडे शाखा अभियंता यांना दोन वर्षासाठी मुदतवाढ देण्यास तसेच १. श्री.एस.पी.ढवळे शाखा अभियंता, स्थापत्य, २. श्री.आर.ए.गोसावी कनिष्ठ अभियंता,स्थापत्य, ३. श्री.एन.बी.वाघमारे शाखा अभियंता,स्थापत्य, ४. श्री.डी.आर.गवई शाखा अभियंता, यांत्रिकी ५. श्री.सी.एल.राठोड कनिष्ठ अभियंता,विद्युत यांना एक वर्षासाठी मुदत वाढ देण्यांत येवून महानगरपालिकेच्या अभियंत्यांना प्रशिक्षित करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या श्री.के.पी.धांडे यांना दि.०८.०६.२००६ नंतर व इतर ५ अभियंतांना दि.३०.०६.२००५ नंतर परत पाठविण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६९/४ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे इटखेडा येथील गट क्र. २४/ पै मिळकतधारक श्री.बालाजी एंटरप्राईजेस यांची उक्त मिळकती मध्ये १५ मीटर व ३० मीटर रूंद रस्ता प्रस्तावित असून मिळकतधारकाने उक्त रस्त्याने बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिनांक ६.११.२००३ रोजी महानगरपालिकेस दिलेली आहे.

दरम्यान मिळकतधारकाने उक्त रस्त्याखालील समोरचा मोबदला अबाधित ठेवून महानगरपालिकेस नोंदणीकृत दस्तऐवज Relinquishment deed क्र.२४९२/०३ दि.२५.११.०३ नुसार हस्तांतर करून उर्वरीत क्षेत्रावर जा.क्र./मनपा/नरवि/रेखांकन/टि.पी.३५४/०४ दि.९.२.२००४ रेखांकन मंजूरी घेतलेली आहे. ३० मी.रूंद रस्त्याचे भूसंपादन कार्यवाही ही भूसंपादन कार्यालयामार्फ़त सुरू आहे. त्यामुळे फ़क्त १५ मी.रूंद रस्त्याखालील क्षेत्र संपादन करणे आवश्यक आहे. १५ मी.रूंद रस्त्याचे बाधीत क्षेत्र १४६८ चौ.मी.आहे.

सबब मिळकतधारकाने रस्त्याखालील क्षेत्र Relinquishment deed आधारे महानगरपालिकेस हस्तांतर झालेले असल्याने उक्त खरेदी सूचना लागू होत नाही, अशी कार्यालयाची धारणा असल्याचे मा.प्रधान सचिव नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/३९६/०४ दि.१२.२.०४ नुसार कळवून प्रत मा.संचालक नगर रचना, पूणे, व मा.उप-संचालक नगर रचना,औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना कळविण्यात आले असता मा.उप-संचालक नगर रचना विभाग औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा.क्र./४३१ दि.२४.२.०४ नुसार कळविले आहे की, मिळकतधारकाने दिलेली खरेदी सूचना लागू होत नाही अशी धारणा योग्य वाटत नाही. या बाबत विधी सल्लागार यांचे मत घेवून कालमर्यादेत भूसंपादन कार्यवाही पूर्ण करणे योग्य ठरेल. त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात यावी असे कळविले आहे.

दरम्यान लोकसभा निवडणूक आदर्श आचार संहिता लागू झाल्यामुळे सर्वसाधारण सभेत धोरणात्मक निर्णय होवू शकला नाही. करीता प्रकरणात कालमर्यादा लक्षात घेत भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/८८८/०४ दिनांक १.४.२००४ अन्वये पाठविण्यात आलेला आहे.

उक्त प्रकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना असल्याने कालमर्यादेत भूसंपादन प्रस्ताव पाठविणे आवश्यक असल्याने भूसंपादन प्रस्ताव पाठविण्यात आला असून सदर भूसंपादनासाठी अंदाजे रू.चार लाख इतका खर्च अपेक्षित आहे.

सबब भूसंपादनाची पुढील कार्यवाही होणेसाठी व भूसंपादनास लागणाऱ्या खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मौ.ईटखेडा येथिल गट नं.२४ पैकी १५ मी.रूंद रस्त्याने बाधित क्षेत्र १४६८ चौ.मी. भू-संपादन करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे कडे यापूर्वीच पाठविलेला असल्याने सदर भू संपादनास येणाऱ्या संभाव्य खर्चासह प्रास्तावित भू संपादनास स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र. ३७०/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, नारेगांव येथील महानगरपालिकेच्या शाळे समोरील खुल्या जागेत बांधण्यात आलेल्या सभागृहास ''दिवंगत हरणाबाई रगडे सभागृह '' असे नांव देण्यांत यावे, करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.राजु शिंदे अनुमोदक : श्री.भगवान रगडे, सौ.लिलावती घायतिलक

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारेगांव येथील महानगरपालिकेच्या शाळे समोरील खुल्या जागेत बांधण्यात आलेल्या सभागृहास ''दिवंगत हरणाबाई रगडे सभागृह '' नांव देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७१/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे धुत हॉस्पीटल चौक, एम.आय.डी.सी. चिकलठाणा येथे लोककवी वामनदादा कर्डक यांचा पुतळा बसविण्यात यावा.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.राजु शिंदे

अनुमोदक : डॉ.भागवत कराड,सौ.साधना सुरडकर, श्री.भगवान घडमोडे, श्री.मधुकर सावंत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे धुत हॉस्पीटल चौक, एम.आय.डी.सी. चिकलठाणा येथे लोककवी वामनदादा कर्डक यांचा पुतळा बसविण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७२/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, संजयनगर मुकूंदवाडी वार्ड क्र.१२ येथे मनपाकडून बांधण्यात येणाऱ्या वाचनालयास शहीद पोचीराम कांबळे वाचनालय मनपा औरंगाबाद असे नांव देण्यांत यावे. करीता प्रस्ताव सर्वानुमते मंजूरीस्तव सादर.

सुचक : १.सौ.लिलावती घायतिलक २. डॉ.भागवत कराड ३.श्री.राजु शिंदे ४.श्री.भगवान घडमोडे ५.श्री.साहेबराव कावडे

अनुमोदक : १. श्री.सोपान पारे २.सौ.रशिदा बेगम गफ्फार यारखान ३.सौ.चंदभागाबाई दाणे ४.श्री.अजीजखान गणीखान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संजयनगर मुकूंदवाडी वार्ड क्र.१२ येथे महापालिकेतर्फे बांधण्यात येणाऱ्या वाचनालयास शहीद पोचीराम कांबळे वाचनालय महानगरपालिका औरंगाबाद असे नांव देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७३/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोहल्ला शहागंज येथील चमन मध्ये पोलीस चौकीसाठी एक हॉल बांधण्याकरिता मा.आमदार यांच्या निधीतुन बांधकाम करण्यास यासाठी आपल्या मनपाचे ना हरकत प्रमाण पत्राची व बांधकाम परवानगीची आवश्यकता आहे.

बांधकाम परवानगी व ना हरकत प्रमाण पत्र देण्याकरिता प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मिर हिदायत अली अनुमोदक : श्री.नजर हमीद, श्री.जावेद कुरैशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला शहागंज येथील चमन मध्ये पोलीस चौकीसाठी एक हॉल बांधण्याकरिता मा.आमदार यांच्या निधीतुन बांधकाम करण्यास महापालिकेचे ना हरकत प्रमाण पत्र व बांधकाम परवानगी देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७४/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक १९ जुन २००३ च्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव क्र.१०३/२ नुसार केंद्र शासन पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सुशिक्षित बेरोजगार लोकांसाठी ४ लोकसेवा केंद्र काढण्यास मंजूरी दिलेली आहे. आगामी वर्षात सर्व ८३ प्रभागात लोकसेवा केंद्र प्रस्तावित करण्यांत यावे असा प्रस्ताव होता. ४ नावांची शिफारस केलेल्या संस्थाना लोकसेवा केंद्र चालवण्यास मंजूरी दिलेली आहे. तरी आता सर्व ८३ वार्डात लोकसेवा केंद्र स्थापन करण्यास व त्यासाठी एक खोली विनामुल्य देण्यांत यावी. सदर प्रस्ताव मंजूर करून केंद्र सरकार व राज्य सरकारला विनंती करून मान्यता घेण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.बबीता सुभाष कागडा अनुमोदक : श्री.मधुकर सावंत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १९ जुन २००३ सर्वसाधारण सभा प्रस्ताव क्र.१०३/२ नुसार केंद्र शासन पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सुशिक्षित बेरोजगार लोकांसाठी ४ लोकसेवा केंद्र काढण्यास मंजुरी दिलेली आहे. आगामी वर्षात सर्व ८३ प्रभागात लोकसेवा केंद्र स्थापन करण्यास व त्यासाठी एक खोली विनामुल्य देण्यांस तसेच केंद्र सरकार व राज्य सरकारला विनंती करून मान्यता घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७५/६ :**

वार्ड क्र.५७ मधील दत्तनगर दादा कॉलनी येथे महापालिकेचा दवाखाना असून या दवाखान्याचा उपयोग जास्तीत जास्त नागरीकांना घेता यावा,याकरीता संजयनगर स्लम या भागात स्थलांतर करणे आवश्यक आहे. संजयनगर हे मध्यवर्ती ठिकाण असून प्रभागातील सर्व नागरीकांना हा दवाखाना सोयीचा होईल. संजयनगर भागामध्ये वाचनालयाकरीता असलेल्या इमारतीमध्ये वाचनालयात लोक येत नाहीत म्हणून बंद करण्यात आलेले असल्यामुळे सदरील इमारतीमध्ये दवाखाना स्थलांतरीत करता येवू शकेल. त्यामुळे दवाखाना स्थलांतरीत करण्याकरीता नविन जागा/इमारत बांधण्याची देखील आवश्यकता नाही. संजयनगर स्लम या ठिकाणी असलेल्या इमारतीमध्येच दत्तनगर येथील दवाखान्याचे स्थलांतर करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.अशरफ मोतीवाला अनुमोदक : श्री.मीर हिदायत अली

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र. ३७६/७ :**

प्रस्ताव सर्व साधारण सभेत सादर करण्यात येतो की, मनपा वार्ड क्र.४२ येथील पाणी पुरवठा साठी अर्थसंकल्प २००४-२००५ मध्ये रक्कम रूपये ०२ लाखाची आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. (पान क्र.१५६ अ.क्र.११४) परंतु एस.टी. कॉलनी येथिल नाल्यास संरक्षित भिंत बांधणे फार आवश्यक आहे, तेथिल रहिवासी यांची जिवित व वित्त हानी होवू नये,यासाठी पाणी पुरवठ्याची ०२ लाखाची तरतुद संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी वर्ग करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.मोहम्मद जावेद कुरैशी अनुमोदक : श्री.मीर हिदायत अली, श्री.नजर हमीद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा वार्ड क्र.४२ येथील पाणी पुरवठा साठी अर्थसंकल्प २००४-२००५ मध्ये रक्कम रूपये ०२ लाखाची आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. (पान क्र.१५६ अ.क्र.११४) परंतु एस.टी. कॉलनी येथिल नाल्यास संरक्षित भिंत बांधणे आवश्यक असल्यामूळे तेथील रहिवासी यांची जिवित व वित्त हानी होवू नये, यासाठी पाणी पुरवठ्याची ०२ लाखाची तरतुद संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी वर्ग करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७७/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, झोन अंतर्गत निघणारे छोटी छोटी कामे ही नागरीकांना मुख्य कार्यालयात येवून तक्रारी करणे परवडत नाही. उदा.ड्रेनेज चोकअप होणे, चेंबर दुरूस्ती, छोटी लाईन जोडणे, मुरूम टाकणे ई. त्यामुळे नागरिक आपला संपूर्ण राग हा झोन अधिकाऱ्यांवर काढतात. त्यास झोन अधिकारी काहीही करू शकत नाही.

त्यामुळे झोन पुरते किरकोळ कामे (रू.पंचविस हजार पर्यंत) तात्काळ करण्याचे अधिकार हे झोन अधिकारी यास द्यावे. जेणे करून मुख्य कार्यालयात नागरीकांना चकरा माराव्या लागणार नाहीत. व त्यांची कामे त्वरीत होतील.

सुचक : श्रीमती पार्वतीबाई मानकापे अनुमोदक:१.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे,२.श्री.चंद्रशेखर जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन अंतर्गत निघणारी छोटी छोटी कामे उदा.ड्रेनेज चोकअप होणे, चेंबर दुरूस्ती, छोटी लाईन जोडणे, मुरूम टाकणे ई. कामे करण्यासाठी झोन अधिकारी यांना रू.पंचविस हजार पर्यंतचे अधिकार देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७८/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मित्र नगर येथिल रामभाऊ म्हाळगी सभागृह येथे आपण मागील वर्षी बालवर्ग व पहिलीची शाळा सुरू केली होती.त्यावेळी आपणांस भरपुर गरीब विद्यार्थी शाळेस मिळाले. यावर्षी नव्याने दुसरा वर्ग चालु केलेला आहे. तरी त्यांना बसण्यासाठी एकच हॉल असल्यामुळे व मुलांची संख्याही वाढलेली आहे.

तरी नविन वर्ग उघडल्यामुळे तात्काळ नविन खोल्या तेथे बांधण्यात याव्यात. ही विनंती.

सुचक : श्रीमती पार्वतीबाई मानकापे अनुमोदक:१.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे,२.श्री.चंद्रशेखर जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मित्र नगर येथिल रामभाऊ म्हाळगी सभागृह येथे बालवर्ग व पहिलीची शाळा सुरू केलेली आहे, विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता व दुसरा वर्ग नव्याने सुरू केल्यामूळे शाळेसाठी खोल्यांची कमतरता भासत असल्यामूळे तेथे नविन खोल्या बांधण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७९/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा वार्ड क्र.४२ येथील आलमगीर कॉलनी, गणेश कॉलनी, या पुर्वी लोक सुविधा लाईट,पाणी,रस्ते,ड्रेनेज इत्यादी सुविधा उपलब्ध होती. परंतु या ठिकाणी गटार नसल्याने नळाचे पाणी हे रस्त्यावर वाहते ज्यामुळे तेथे किरकोळ अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे. व वृध्द नागरिकांना येणे जाणेस फार त्रास होत आहे. तसेच पावसाळ्याचे पाणी सदरील ठिकाणी तुंबलेले असते व ते पाणी लोकांच्या घरात शिरते ज्यामुळे जिवीत व मालमत्तेचे हानी जास्त प्रमाणात होते.

सदर ठिकाणची जिवितहानी व मालमत्तेची हानी होवू नये, याकरीता तेथे गटार बांधण्यात यावी करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.मोहम्मद जावेद कुरैशी अनुमोदक : श्री.मीर हिदायत अली, सौ.सलमा बानो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा वार्ड क्र.४२ येथील आलमगीर कॉलनी, गणेश कॉलनी, या पुर्वी लोक सुविधा लाईट,पाणी,रस्ते,ड्रेनेज इत्यादी सुविधा उपलब्ध होती. परंतु या ठिकाणी गटार नसल्याने नळाचे पाणी हे रोड रस्त्यावर वाहते करीता तेथे गटार बांधण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८०/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२५ उस्मानपूरा येथील पोलीस चौकीमागे बांधण्यात आलेल्या मनपा बहुउद्देशिय हॉलला नगरसेवक स्व.दलबीरसिंग जबिंदा बहुउद्देशिय हॉल असे नांव देण्यासाठीचा प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

सुचक : श्री.नंदकुमार घोडेले, श्री.किशनचंद तनवाणी

अनुमोदक : ॲड.सौ.सुवर्णा चंद्रात्रे, श्री.भगवान रगडे, श्री.चंद्रशेखर जैस्वाल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२५ उस्मानपूरा येथील पोलीस चौकीमागे बांधण्यात आलेल्या मनपा बहुउद्देशिय हॉलला नगरसेवक स्व.दलबीरसिंग जबिंदा बहुउद्देशिय हॉल असे नांव देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८१/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहराचा झपाट्याने विकास होत असून शहरातील लोकसंख्या त्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे शहरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात नविन निवासी बांधकामे होत आहे. शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता त्या प्रमाणात कचऱ्याची विल्हेवाट लावणेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. करीता शहरातील कचऱ्यास आळा बसावा यासाठी बांधकाम परवानगी देतेवेळी प्रत्येक बिल्डरने/जागा मालकाने कचऱ्याची विल्हेवाट लावणेसाठी स्व:खर्चाने लोकसंख्येच्या प्रमाणानुसार स्वत: कायमस्वरूपी कचराकुंडी बांधुन घ्यावी. जेणे करून कचऱ्याची विल्हेवाट तेथेच लागेल. या दृष्टीकोनातुन संबंधीताने कचराकुंडीचे बांधकाम करावे अशी अट बांधकाम परवानगी देते वेळी टाकणे व याप्रमाणे बांधकाम झाल्यानंतरच संबंधीतास बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक करावे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.साधना गणेश सुरडकर अनुमोदक : डॉ.भागवत कराड, श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील कचऱ्यास आळा बसावा यासाठी बांधकाम परवानगी देतेवेळी प्रत्येक बिल्डरने/जागा मालकाने कचऱ्याची विल्हेवाट लावणेसाठी स्व:खर्चाने लोकसंख्येच्या प्रमाणानुसार स्वत: कायमस्वरूपी कचराकुंडी बांधुन घ्यावी, जेणे करून कचऱ्याची विल्हेवाट तेथेच लागेल. या दृष्टीकोनातुन संबंधीताने कचराकुंडीचे बांधकाम करावे अशी अट बांधकाम परवानगी देते वेळी टाकणे व याप्रमाणे बांधकाम झाल्यानंतरच संबंधीतास बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक करावे यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८२/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेतील सर्व तांत्रिक विभाग नविन इमारतीत स्थापन करण्यांत आले असून मुख्य इमारतीत मा.आयुक्त,मा.पदाधिकारी,उप-आयुक्त,आस्थापना ही विभाग आहेत. मनपा अधिकाऱ्यांना वेळोवेळी मा.आयुक्त,मा.पदाधिकारी,उपआयुक्त यांचेकडे यावे/जावे लागते या दोन्ही इमारतीमध्ये येण्या जाण्यास अधिकाऱ्यांना शारीरीक त्रास तर होतोच शिवाय त्यांचा वेळही वाया जातो.

करीता या दोन्ही इमारतींमध्ये येण्या जाण्याकरीता महानगरपालिकेतर्फे ओव्हर ब्रीज (उड्डाण पुल) बांधण्यांत यावा करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.साधना सुरडकर          अनुमोदक : डॉ.भागवत कराड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतील सर्व तांत्रिक विभाग नविन इमारतीत स्थापन करण्यांत आलेले असल्यामूळे मुख्य इमारत व नविन इमारतीत जाणे येणेसाठी ओव्हर ब्रीज (उड्डाण पुल) बांधण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८३/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शहानुरवाडी परिसरातील आठवडी बाजार,शॉपिंग कॉम्प्लेक्स साठी राखीव असलेल्या जागेवर महानगरपालिकेतर्फे बोल्ट पध्दतीने शॉपिंग कॉम्प्लेक्स व वाहन तळ बांधण्यात यावे. सध्याची मनपाची आर्थिक स्थिती बिकट असल्याने बोल्ट पध्दतीने शॉपिंग कॉम्प्लेक्स व वाहनतळ बांधल्यास मनपास त्याचा फायदा होईल.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.साधना सुरडकर          अनुमोदक : डॉ.भागवत कराड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरवाडी परिसरातील आठवडी बाजार,शॉपिंग कॉम्प्लेक्स साठी राखीव असलेल्या जागेवर महानगरपालिकेतर्फे बोल्ट पध्दतीने शॉपिंग कॉम्प्लेक्स व वाहन तळ बांधण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८४/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहराचा वाढता व्याप लक्षात घेता शहरातील मुलांना खेळण्यासाठी ग्राऊंड उपलब्ध नाही. त्यामुळे मुलांना/ युवकांना खेळण्यासाठी योग्य मैदान उपलब्ध होणे गरजेचे आहे. सध्याची मनपाची आर्थिक स्थिती बिकट असल्याने बोल्ट पध्दतीने क्रिडा संकुल बांधल्यास मनपास त्याचा फायदा होईल. त्या दृष्टीकोनातुन खिवंसरा पार्क येथील गार्डन व प्ले ग्राऊंड करीता आरक्षित असलेल्या जागेवर मनपातर्फे बोल्ट पध्दतीने क्रिडा संकुल बांधण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.साधना सुरडकर          अनुमोदक : डॉ.भागवत कराड.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराचा वाढता व्याप लक्षात घेता शहरातील मुलांना खेळण्यासाठी ग्राऊंड उपलब्ध नसल्यामूळे मुलांना/ युवकांना खेळण्यासाठी योग्य मैदान उपलब्ध होणे साठी व मनपाची आर्थिक स्थिती लक्षात घेता, खिवंसरा पार्क येथील गार्डन व प्ले ग्राऊंड करीता आरक्षित असलेल्या जागेवर मनपातर्फे बोल्ट पध्दतीने क्रिडा संकुल बांधण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८५/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जालना रोड लगत महेशनगर- बसैय्येनगर या रस्त्यास ''विर सावरकर मार्ग '' व जालना रोड लगतच्या महेशनगर जवळील चौकास ''महेश चौक '' असे नांव देण्यात यावे असा ठराव सर्वसाधारण सभेत घेण्यात यावा.

सुचक : श्री.प्रशांत सुभाष देसरडा — अनुमोदक: श्री.भगवान घडामोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोड लगत महेशनगर- बसैय्येनगर या रस्त्यास ''विर सावरकर मार्ग '' व जालना रोड लगतच्या महेशनगर जवळील चौकास ''महेश चौक '' असे नांव देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८६/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका प्राथमिक शाळेचा दर्जा सुधारण्याकरिता महानगरपालिकेच्या सर्व शिक्षकांना तज्ञांमार्फ़त योग्य ते मार्गदर्शन करणेकरीता दोन दिवसीय चर्चासत्र/ प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात यावे जेणेकरून शाळेचा दर्जा उंचावेल.करिता या शिबीरास होणाऱ्या खर्चास तसेच असे शिबीर घेणे करीता प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक: डॉ.भागवत कराड — अनुमोदक: श्री.राजु शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका प्राथमिक शाळेचा दर्जा सुधारण्याकरिता महानगरपालिकेच्या सर्व शिक्षकांना तज्ञांमार्फ़त योग्य ते मार्गदर्शन करणेकरीता दोन दिवसीय चर्चासत्र/ प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करणे व शाळेचा दर्जा उंचावणे करिता या शिबीरास येणाऱ्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८७/१८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.०८ मध्ये नविन अर्थसंकल्पामध्ये ठेवण्यात आलेल्या १२ लाख नविन पोल लावण्याकरिता ठेवलेले आहे. तरी आपण त्या ऐवजी मसनतपुर,पॉवरलूम येथे पथदिवे लावण्यात यावे.

सुचक: श्री.राजु शिंदे — अनुमोदक: श्री.सोपान पारे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.०८ करीता अर्थसंकल्पामध्ये नविन पोल लावण्याकरिता ठेवण्यात आलेली१२ लाख रूपयेची तरतूद ऐवजी मसनतपुर,पॉवरलूम येथे पथदिवे लावण्याकरीता सदरील तरतूद वापरण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८८/१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, येणाऱ्या सर्वसाधारण सभेमध्ये वॉर्ड क्र.०८ मध्ये डांबरीकरण करण्याकरिता पृष्ठ क्र.१११ अ.क्र. ०७ रक्कम २.५० लाख ठेवण्यात आलेली आहे. त्याऐवजी मसनतपुर

येथे तरूणासाठी व्यायाम शाळा बांधण्याकरीता मंजुरी देण्यात यावी. तात्काळ काम चालु करण्यास आदेशीत करावे.

सुचक: श्री.राजु शिंदे अनुमोदक: सौ.साधना सुरडकर, श्री. बापु घडमोडे, श्री.भाऊसाहेब वाघ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०८ मध्ये डांबरीकरण करण्याकरिता पृष्ठ क्र.१११ अ.क्र. ०७ रक्कम २.५० लाख ठेवलेली तरतूदी ऐवजी मसनतपुर येथे तरूणासाठी व्यायाम शाळा बांधण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८९/२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.९ चिकलठाणा येथे सावित्रीनगर भागात लहान मुलांकरिता महानगरपालिके तर्फे बालवाडी वर्ग (मराठी) चालु करण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक: श्री.साहेबराव कावडे अनुमोदक: श्री.राजु शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.९ चिकलठाणा येथे सावित्रीनगर भागात लहान मुलांकरिता महानगरपालिके तर्फे बालवाडी वर्ग (मराठी) चालु करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९०/२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.९ चिकलठाणा येथे महानगरपालिके तर्फे हिनानगर भागात लहान मुलांकरिता मराठी व उर्दु माध्यमातील बालवाडी वर्ग चालु करण्यात यावेत. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.साहेबराव कावडे अनुमोदक: श्री.राजु शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.९ चिकलठाणा येथे महानगरपालिके तर्फे हिनानगर भागात लहान मुलांकरिता मराठी व उर्दु माध्यमातील बालवाडी वर्ग चालु करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९१/२२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८ मध्ये शहानगर, पॉवरलुम व मसनतपुर येथे महानगरपालिके तर्फे बालवाडी वर्ग सुरू करण्यात यावे. जेणेकरून या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या मुलांवर योग्य ते संस्कार होतील.

सुचक: श्री.राजु शिंदे अनुमोदक: श्री.साहेबराव कावडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८ मध्ये शहानगर, पॉवरलुम व मसनतपुर येथे महानगरपालिके तर्फे बालवाडी वर्ग सुरू करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९२/२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहर अभियंता यांनी माझ्या प्रभागा मधील शबीस्तान कॉलनी येथील शबीस्तान कॉलनी मंजूर रेखांकनातील खुली जागा संरक्षित करणे या कामासाठी १,५०,००० रूपयांची तरतुद चालु वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये ठेवण्यात आली आहे. पृष्ठ क्रमांक १२१ अ.क्र.१७

सदरील ठिकाणी,काम न करता त्या कामा ऐवजी तेवढ्याच तरतुदी मध्ये खालील कामे करण्यासाठी प्रस्ताव ठेवण्यात यावा.

स्वामी विवेकानंद उद्यानात मेटल हाय लाईट दिवे बसविणे या कामासाठी १,००,००० तरतुद ठेवण्यात आली आहे,पृष्ठ १८४ अ.क्र.४ सदरील कामे रद्द करून खालील कामे करण्यासाठी मंजूरीस्तव प्रस्ताव ठेवण्यात यावा.

शबीस्तान कॉलनी,व न्यु.एस.टी.कॉलनी येथे सोडियम पोल बसविणे, कटकट गेट ते सिडको कडे जाणाऱ्या १००' डी.पी.रोडवरील साहिल हॉटेल येथील टी पॉईट वर मेटल मिनी हायमास्ट बसविणे.

सुचक : सौ.नुसरत बानो फेरोज खान अनुमोदक : सौ.रशिदा बेगम गफ्फार यारखान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शबीस्तान कॉलनी येथील शबीस्तान कॉलनी मंजूर रेखांकनातील खुली जागा संरक्षित करणे या कामासाठी १,५०,००० रूपयांची तरतुद चालु वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये ठेवण्यात आली आहे. पृष्ठ क्रमांक १२१ अ.क्र.१७ आणि स्वामी विवेकानंद उद्यानात मेटल हाय लाईट दिवे बसविणे या कामासाठी १,००,००० तरतुद ठेवण्यात आली आहे,पृष्ठ १८४ अ.क्र.४ सदरील कामे रद्द करून शबीस्तान कॉलनी,व न्यु.एस.टी.कॉलनी येथे सोडियम पोल बसविणे., कटकट गेट ते सिडको कडे जाणाऱ्या १००' डी.पी.रोडवरील साहिल हॉटेल येथील टी पॉईट वर मेटल मिनी हायमास्ट बसविणे ही कामे करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९३/२४ :**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत मोहल्ला सिल्लेखाना येथील चौकात स्व.राजीव गांधी यांचा पुतळा बसविणे बाबत प्रस्ताव पारीत झालेला आहे. परंतु त्या चौका लगत रस्ते रूंदीकरणासाठी भूसंपादन करणे आहे. त्यामुळे सदरील ठिकाणी पुतळा बसविता येत नसल्याने सदरील ठिकाण बदलुन त्याऐवजी जुनी हायकोर्टासमोर तापडिया टेरेसेस जवळ किंवा ज्युब्ली पार्क भडकल गेट येथील वाहतुक सिग्नल जवळ तसेच महानगरपालिका समोरील वाहतुक बेट मध्ये स्व.राजीव गांधी यांचा पुतळा बसविणे व त्यास येणारा संभावित खर्चास मंजुरी मिळणे सह प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक: श्री.मिर हिदायत अली अनुमोदक: श्री.नजर हमीद अ.गफुर

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र. ३९४/२५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २००४-२००५ च्या मुळ अर्थसंकल्पात खालील दर्शविलेली कामे समाविष्ट करण्यांत आली होती परंतु मनपा अर्थसंकल्पीय विशेष मा.सर्वसाधारण सभेत ही कामे वगळण्यात आलेली आहेत. माझ्या वार्डात खालील विकास कामे करणे अत्यंत आवश्यक आहे. तरी सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात खालील विकास कामांचा समावेश करण्यांत यावा.

| अ.क्र. | कामाचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| ०१. | पिरबाजार येथे जूने मार्केट तोडून नविन भाजी मंडई बांधणे | ५.०० लाख |
| ०२. | उस्मानपूरा येथे छोट्या गल्लीत कॉंक्रीट रस्ते तयार करणे | २.०० लाख |
| ०३. | उस्मानपूरा येथे डांबरीकरण करणे | ५.०० लाख |
| ०४. | उस्मानपूरा येथे ड्रेनेज लाईन टाकणे | २.०० लाख |
| ०५. | तेग बहादुर शाळा ते एस.बी.एच.पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे. | ३.०० लाख |

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.राजेंद्रसिंग जबिंदा अनुमोदक : श्री.संजय शिरसाट

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अ.क्र.१ ते ५ मधील कामे पुन्हा डांबरीकरणातून बचत होणाऱ्या रकमेतून करण्यास आणि किंवा सुधारीत अंदाजपत्रकाच्या वेळी समाविष्ट करण्यास व तो पर्यंत या कामाची निविदा काढणे ई. कामे करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ३९५/१ :**

सहाय्यक संचालक, नगर रचना महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, महाराष्ट्र शासन विकास विभागाची अधिसुचना क्रमांक : टीपीएस - ३०९९/११०७/प्र.क्र.४७ (अ)/२०००/ नवि-३० दि.१८ एप्रिल २००१ नुसार औरंगाबाद शहराच्या मुळ हद्दीची सुधारित विकास योजना मंजूर करण्यात आली असून ती १ जुन २००१ पासून अंमलात आली आहे.

उक्त विकास योजने मधे नगर भुमापन क्र.१८३४९/३ (भाग) मधील ''सत्यम सिनेमा '' क्षेत्र ४९५० चौ.मी.वाणिज्य विभागात समाविष्ट आहे आणि ज्या अर्थी उक्त क्षेत्रावरील ''सत्यम सिनेमा '' ही इमारत पाडुन टाकण्यात आली असून उक्त क्षेत्र मोकळे आहे. उक्त क्षेत्रास ६.०० मी रूंदीचा पोहच रस्ता उपलब्ध आहे. (ज्याची नोंद मिळकत पत्रिकेवर नमुद आहे.) त्यामुळे विकास नियंत्रण नियमावली नुसार तेथे सिनेमा गृहाचा वापर अनुज्ञेय नाही. उक्त क्षेत्राच्या आजुबाजुला चांगल्या स्वरूपात रहिवास विकास झालेला आहे.

तथापि उक्त क्षेत्र विकास योजनेत वाणिज्य विभागात समाविष्ठ असल्याने तेथे रहिवास वापर अनुज्ञेय नाही. या बाबीचा विचार करता उक्त क्षेत्र वाणिज्य विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ठ करणेसाठी फ़ेरबदलाचा प्रस्ताव कार्यान्वित करणे बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील पत्रक क्र.टिपीएस ३००४/३८८/प्र.क्र. ७७/२००४/नावि-३० दि.६ जुलै २००४ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेस खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

**निर्देश**

'' उक्त विकास योजनेमधे ''सत्यम सिनेमा '' म्हणून दर्शविण्यात आलेले उक्त क्षेत्र (क्षेत्र४९५० चौ.मी) वाणिज्य विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ठ करणेसाठी औरंगाबाद महानगरपालिकेने उक्त अधिनियमाच्या कलम (३७) च्या तरतुदीचे पालन करून फ़ेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करावा. तसेच उक्त अधिनियमातील कलम ३७ (१) मधील तरतुदीनुसार ६० दिवसांच्या विहीत कालावधीत तशी फ़ेरबदलाची सूचना विहीत मार्गाने प्रसिध्द करावी व तद्नंतर उक्त अधिनियमातील तरतुदीचे पालन करून फ़ेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करावा. ''

तरी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार पुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही करून शासनाचे निर्देशानुसार फ़ेरबदलाचा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनास सादर करावयाचे सर्व अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांना देण्यात यावे.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र.टीपीएस-३००४/३८८/प्र.क्र.७७/२००४/नवि-३० दिनांक ६ जुलै २००४ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेस दिलेल्या निर्देशानुसार दिनांक १ जून २००१ पासून अंमलात आलेली औरंगाबाद शहर मुळ हद्दीची सुधारित विकास योजना यातील. नगर भूमापन क्र.१८३४९/३ (भाग) या वाणिज्य विभागात समाविष्ट असलेल्या ४९५० चौ.मी.''सत्यम सिनेमा '' क्षेत्र वाणिज्य क्षेत्रातून वगळून रहिवास

क्षेत्रात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये पुढील आवश्यक ती सर्व कायदेशीर कार्यवाही करून शासनाचे निर्देशानुसार फ़ेरबदलाचा अंतिम प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी सादर करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका यांना देण्यास सर्वानुमते स्वीकृतीसह मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९६/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गात कार्यरत असलेल्या दैनिक वेतनावरील कामगारांना कायम नियुक्ती देणेसाठी शासनाने दि.१०.११.२००३ च्या शासन निर्णयानुसार ११२४ पदांना मंजूरी दिलेली होती. उक्त शासन निर्णयामध्ये दैनिक वेतनावरील कामगारांना जेष्टतेनूसार कायम करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तसेच यापूढे महानगरपालिकेने शासनाच्या मान्यतेशिवाय रोजंदारीवर / ठराविक वेतनावर अथवा अन्य मार्गाने कर्मचारी नियुक्त करू नये,असे निर्देश दिलेले आहे.

उक्त शासन निर्णयाच्या निर्देशानुसार दैनिक वेतनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांना जेष्ठतेनुसार कायम नियुक्ती देण्यात आलेली आहे. तथापि मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार दैनिक वेतनावरील कामगाराची तयार करण्यात आलेल्या जेष्ठता यादीमधील दैनिक वेतनावरील काही कामगार अल्प मुदतीच्या खंडानंतर महानगरपालिका सेवेत दैनिक वेतनावर घेण्यात आले होते त्यांना कामस्वरूपी सेवेमध्ये सामावून घ्यावे किंवा कसे याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते. शासनाने उक्त पत्राच्या अनुषंगाने कळविले आहे की, शासन निर्णय दि.१०.११.२००३ मधील अट क्र.३ स्वयंस्पष्ट आहे. मुंबई महापालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनूसार प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करावी व अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक असल्यास निश्चित स्वरूपाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा असे शासनाने त्यांचे पत्र दि.२४.०६.२००४ अन्वये कळविले आहे.

अल्प मुदतीच्या खंडानंतर महानगरपालिका सेवेत दैनिक वेतनावर घेण्यात आलेले कामगार महापालिका सेवेत पूर्वी दैनिक वेतनावर कार्यरत होते. परंतू वेगवेगळ्या कारणास्तव मध्यतंरीच्या काळात ते कामावर गैरहजर असल्यामूळे त्यांच्या दैनिक वेतनावरील नियुक्तीची मुदतवाढ खंडीत करण्यात आलेली होती. त्यांनी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार व वैद्यकीय प्रमाणपत्रानुसार त्यांना ऑक्टोबर / नोंव्हेबर २००३ मध्ये फेर नियुक्ती देवून दि.३१.१२.२००३ पर्यंत मुदतवाढ देण्यांत आली होती. परंतू शासन निर्णय दि.१०.११.२००३ च्या निर्णयातील टिप क्र.१ मध्ये शासनाच्या मान्यतेशिवाय रोजंदारीवर, ठराविक वेतनावर अथवा अन्य मार्गाने कर्मचारी नियुक्त करू नये अशी अट घातलेली असल्यामूळे त्यांना दि.१.१.२००४ पासून पूढे दैनिक वेतनावर पुढील मुदतवाढ देण्यांत आलेली नाही.

त्याचप्रमाणे जेष्ठता यादीतील जे कामगार कामावर नाही अशा काही कामगारांनी व कामगार संघटना, विविध कर्मचारी संघटनानी त्यांना कामावर घेण्यासाठी उपोषणे व निदर्शने करून मागणी करीत आहेत. तसेच काही दैनिक वेतनावरील कामगारांनी त्यांना कामावर घेण्यासाठी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेल्या आहेत. उक्त याचिकामध्ये मा.उच्च न्यायालयाचा निर्णय अद्याप प्रलंबित आहे.

तरी या कामी प्रचलित शासन आदेश व कामगार संघटना यांची मागणी विचारात घेऊन उचित निर्णय होणेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिका आस्थापनेवरील दैनिक वेतनावर काम करणाऱ्या कामगाराच्या सेवे बाबत महापालिकेतील कामाचा व्याप लक्षात घेता त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार तयार करण्यात आलेल्या दैनिक वेतनावरील कामगारांची जेष्ठता यादी आणि या यादीतील जे कामगार अल्प मुदतीच्या कालखंडानंतर पून्हा महानगरपालिकेच्या सेवेत दैनिक वेतनावर घेण्यांत आले आहेत. अशा कामगारांना दिनांक १०.११.२००३ च्या शासन

निर्णयातील टिप क्र.१ ला अनुसरून दिनांक ०१.०१.२००४ पासून पूढे दैनिक वेतनावर मुदतवाढ मिळण्याबाबत शासनाचे दि.२४.०६.२००४ पत्रकाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करून प्रस्ताव शासनास सादर करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९७/३ :**

सहाय्यक संचालक नगर रचना प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेच्या हद्दी बाहेरील व सिडको प्राधिकरण अंतर्गत विकसीत झालेल्या शिवाजीनगर या भागाचा महानगरपालिका हद्दीत समावेश करण्याचा प्रस्ताव आहे.

सिडको प्राधिकरणाच्या ११ वी व १२ वी योजने अंतर्गत विकसीत झालेल्या शिवाजीनगर या भागातील मतदारांची नांवे सन २००० च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये समाविष्ठ नसल्यामूळे तेथील नागरीकांनी या संदर्भात मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद मध्ये रिट याचिका क्र.५९१/२००० आणि ६१०/२००० दाखल केली होती. सदरील याचिकाची एकत्रित सुनावणी होवून मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०२.०३.२००० रोजी निर्णय देवून दोन्ही याचिका निकाली काढल्या. मा.उच्च न्यायालयाने शिवाजीनगर हा भाग (११ वी व १२ वी योजना सिडको) महानगरपालिकेच्या हद्दी बाहेर असल्यामूळे सदरील भागातील मतदार करीता स्वंतत्र नगर पंचायत स्थापन करावी किंवा सदरील भाग महानगरपालिकेच्या हद्दीत हद्द वाढीच्या कायदेशिर पध्दतीचा अवलंब करून समावेश करण्याची कार्यवाही महाराष्ट्र शासनाकडून अपेक्षित केली आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्देशास अनुसरून महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाचे पत्र दिनांक १५.०२.२००२ अन्वये कळविले की, या बाबत पूढील कार्यवाही करण्यापूर्वी शिवाजीनगर भाग महानगरपालिकेत समाविष्ठ करून घेण्यास महानगरपालिकेची मान्यता आहे किंवा कसे या बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३ ची पोट कलम-३ (अे) नुसार महानगरपालिकेशी विचार विनिमय करणे आवश्यक ठरते. तसेच उक्त कलमाच्या तरतुदीस अनुसरून सदर प्रस्तावास महानगरपालिकेची मान्यता आहे किंवा कसे या बाबत सविस्तर अभिप्राय महानगरपालिकेच्या ठरावासह शासनास पाठविण्याचे निर्देश दिले आहे.

शिवाजी नगर हा भाग सिडको नियोजन प्राधिकरण मार्फत विकसीत झालेला असून महानगरपालिकेच्या गारखेडा परिसरातील महानगरपालिकेच्या हद्दीच्या दक्षिणेकडे रेल्वेलाईन पर्यंत आहे.या भागात ११ वी व १२ वी योजनेतील एकूण २१५७ टेनामेंट आहे. जागेचे एकूण क्षेत्रफळ ४५.१६ हेक्टर आहे. लोकसंख्या अंदाजे १०००० आहे. वरील ४५.१६ हेक्टर क्षेत्रात रहिवाशी वापरासह इतर वापर आहे. हा भाग सातारा या महसूल गावाच्या शिवारातील गट नंबर १२१, १२२, १२३, १२४/१, १२५, १२६/१ व १२७ या जमिनीचे रितसर संपादन करून सिडकोने ताब्यात घेतले होते.

सिडको प्राधिकरण अंतर्गत सदर क्षेत्राचा विकास झालेला असल्याने आणि सदर भागाची केलेली विकास योजना सिडको नियोजन प्राधिकरणाने तयार केलेले असल्याने त्यामधील विकास योजनेनुसार आवश्यक सुखसोयी तसेच प्राथमिक आरक्षणाचा विकास करण्याची जबाबदारी सिडकोवर राहिल. फक्त भौगोलिक क्षेत्र महानगरपालिकेमध्ये समाविष्ठ करणे व तेथील नागरीकांचा सिडको क्षेत्रा प्रमाणे महानगरपालिका मतदार क्षेत्रामध्ये समावेश करण्यांत यावा.

करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ची कलम-३ चे पोट कलम-३ (अे) मधील तरतुदीस अनुसरून शिवाजीनगर भागापूरती हद्द वाढवून महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व नमूद हद्दी व क्षेत्रासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ची कलम-३ चे पोट कलम-३ (अे) मधील तरतुदीस अनुसरून शिवाजीनगर भागापूरती हद्द वाढवून महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ करण्यांस तसेच सिडको प्राधिकरण अंतर्गत सदर क्षेत्राचा

विकास झालेला असल्याने आणि सदर भागाची केलेली विकास योजना सिडको नियोजन प्राधिकरणाने तयार केलेले असल्याने त्यामधील विकास योजनेनुसार आवश्यक सुखसोयी तसेच प्राथमिक आरक्षणाचा विकास करण्याची जबाबदारी सिडकोवर राहील. फ़क्त भौगोलिक क्षेत्र महानगरपालिकेमध्ये समाविष्ठ करणे व तेथील नागरीकांचा सिडको क्षेत्राप्रमाणे महानगरपालिका मतदार क्षेत्रामध्ये समावेश करण्यांत यावा. तसेच सदरील प्रस्ताव शासनास पाठविण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९८/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमसीओ-१२९५/३३०८/प्रक्र.१३८/९५/नवि-१४ मंत्रालय,मुंबई दि.१० मे २००४ अन्वये राज्यातील अ ब व क वर्ग नगरपरिषदांचे मुख्याधिकारी यांना वेतन श्रेणीवाढ देवून त्यांना महाराष्ट्रातील विविध महानगरपालिकांमध्ये उप आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व आयुक्त या पदावर नियुक्त्या होत आहेत. महानगरपालिका आस्थापना खर्च हा महानगरपालिका उत्पन्नातून होतो. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीप्रमाणे या सर्व पदांसाठी नियुक्ती करण्याचे अधिकार महानगरपालिकांचे (सर्वसाधारण सभेचे ) आहे. महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांना मर्यादीत पदोन्नतीची संधी मिळते व या शासन निर्णयामूळे ती संधी देखिल संपुष्टात आलेली आहे. नगरपरिषदांचे नियम व कायदा भिन्न आहे व महानगरपालिकेचा कायदा वेगळा आहे. नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांचा पगार- भत्ते - नियुक्ती शासनाकडून होते. व महानगरपालिकासाठी स्वंतत्र सेवा भरती नियम आहेत. त्या सेवा भरती नियमात ही नगरपालिकांच्या मुख्याधिकारी या संवर्गातून ही पदे भरण्याची तरतूद नाही. सबब सदर शासन निर्णय रद्द करण्याबाबत शासनास कळविण्यांत यावे. शासनाने महापालिकांची कोणत्याही प्रकारची संमती न घेता सदरचा निर्णय महानगरपालिकेवर लादलेला आहे. शासनाचा हा निर्णय कायद्यानुसार महानगरपालिकेस बंधनकारक नाही. सबब या निर्णयाद्वारे या महापालिकेत मुख्याधिकारी संवर्गातील अधिकारी आल्यास त्यांना रूजू करून घेण्यात येणार नाही असे शासनास कळविणे योग्य.

करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.नंदकुमार घोडेले, सभापती स्थायी समिती, श्री.किशनचंद तनवाणी, सभागृह नेता

अनुमोदक :सौ.साधना सुरडकर,उपमहापौर, श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली, विरोधी पक्षनेता

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमसीओ-१२९५/३३०८/प्रक्र.१३८/९५/नवि-१४ मंत्रालय,मुंबई दि.१० मे २००४ अन्वये राज्यातील अ ब व क वर्ग नगरपरिषदांचे मुख्याधिकारी यांना वेतन श्रेणीवाढ देवून त्यांना महाराष्ट्रातील विविध महानगरपालिक ांमध्ये उप आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व आयुक्त या पदावर नियुक्त्या होत आहेत. महानगरपालिका आस्थापना खर्च हा महानगरपालिका उत्पन्नातून होत असल्यामूळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीप्रमाणे या सर्व पदांसाठी नियुक्ती करण्याचे अधिकार महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे आहे. शासन निर्णयामूळे महापालिका अधिकाऱ्यांना पदोन्नतीची संधी मिळत नसल्यामूळे तसेच नगरपरिषदांचे नियम व कायदा भिन्न असून,महानगरपालिकेचा कायदा वेगळा आहे. महानगरपालिकासाठी स्वंतत्र सेवा भरती नियम असल्यामूळे त्या सेवा भरती नियमात ही नगरपालिकांच्या मुख्याधिकारी या संवर्गातून ही पदे भरण्याची तरतूद नाही. सबब सदर शासन निर्णय रद्द करण्याबाबत शासनास कळविण्यांस व शासनाने महापालिकांची कोणत्याही प्रकारची संमती न घेता सदरचा निर्णय महानगरपालिकेवर लादलेला असल्यामूळे शासनाचा हा निर्णय कायद्यानुसार महानगरपालिकेस बंधनकारक नाही. सबब या निर्णयाद्वारे या महापालिकेत मुख्याधिकारी संवर्गातील

अधिकारी आल्यास त्यांना रूजू करून घेण्यात येणार नाही,असा ठराव सर्वानुमते संमत करण्यांत येतो, प्रशासनाने महापालिकेचा निर्णय शासनास कळविणेसही सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९९/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.२१ मधील तापडीयानगर येथे मनपातर्फे बांधण्यात आलेल्या व्यायाम शाळेस स्व.राजेंद्रसिंहजी उर्फ रज्जुभैय्या व्यायामशाळा असे नांव देण्यांत यावे,करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.साधना सुरडकर अनुमोदक : डॉ.आशा बिनवडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२१ मधील तापडीयानगर येथे मनपातर्फे बांधण्यात आलेल्या व्यायाम शाळेस स्व.राजेंद्रसिंहजी उर्फ रज्जुभैय्या व्यायामशाळा असे नांव देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४००/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका वॉर्ड क्र.७८ भागातील संस्थान गणपती मंदीर ते नवाबपुरा या रस्त्याला या भागातील माजी नगराध्यक्ष स्व.बाबुलालजी पराती यांचे नांव देण्यात यावे.

करिता प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मिर हिदायत अली अनुमोदक : श्री.किशोर तुलसीबागवाले, श्री.अशरफ़ मोतीवाला

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका वॉर्ड क्र.७८ भागातील संस्थान गणपती मंदीर ते नवाबपुरा या रस्त्याला या भागातील माजी नगराध्यक्ष स्व.बाबुलालजी पराती यांचे नांव देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०१/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४२ येथील शांती हॉटेल ते काचीवाडा पर्यंत नविन ६० फ़ूटाच्या रोड रस्त्याला बिग्रेडीअर शहीद अब्दुल हमीद यांचे नांव देण्यात यावे करिता प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मोहंमद जावेद कुरैशी अनुमोदक : श्री.रावसाहेब औताडे, श्री.किशोर तुलसीबागवाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४२ येथील शांती हॉटेल ते काचीवाडा पर्यंत नविन ६० फ़ूटाच्या रोड रस्त्याला बिग्रेडीअर शहीद अब्दुल हमीद यांचे नांव देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०२/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१८ मध्ये जवाहर कॉलनी परिसरातील भगवती कॉलनी येथे महानगरपालिके तर्फ़े बांधण्यात आलेल्या व्यायाम शाळेस स्व.मोरोपंतजी पिंगळे व्यायाम शाळा असे नांव देण्यात यावे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : डॉ.आशा बिनवडे अनुमोदक : सौ.साधना सुरडकर, सौ.जयश्री कुलकर्णी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१८ मध्ये जवाहर कॉलनी परिसरातील भगवती कॉलनी येथे महानगरपालिके तर्फ़े बांधण्यात आलेल्या व्यायाम शाळेस स्व.मोरोपंतजी पिंगळे व्यायाम शाळा असे नांव देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०३/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,यशोधरा कॉलनी येथील महानगरपालिकेची शाळा ही भाड्याच्या जागेमध्ये भरत आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तरी हत्तेसिंगपुरा येथील (नेहरूनगर) येथे एक ते दीड वर्षापूर्वी वाचनालयासाठी दहा लाख रूपये खर्च करून वाचनालयासाठी ईमारत बांधण्यात आलेली आहे. परंतु अद्याप पर्यंत सदरील ठिकाणी वाचनालय सुरू करण्यात आलेले नाही. त्यामुळे वाचनालयाची ईमारत मोकळीच आहे. सदरील ईमारत बांधली परंतु त्या ईमारतीचा अद्याप पर्यंत कुठलाही वापर नाही व या ठिकाणी सुरक्षिततेची कसलीही व्यवस्था नसल्यामुळे या परिसरातील मुले सदरील ईमारतीचे नुकसान करत आहेत म्हणून आपण वरील ठिकाणची शाळा वाचनालयाच्या ईमारती मध्ये सुरू केल्यास महानगरपालिकेचे भाड्यापोटी जाणारे पैसेही वाचतील व वाचनालयाची ईमारत ही सुरक्षित राहील. म्हणून आपण दि.२०.७.२००४ रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव ठेवावा ही नम्र विनंती.

सुचक : नुसरत बानो फ़ेरोज खान अनुमोदक : श्री.खाजा शरीफ़ोद्दीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,यशोधरा कॉलनी येथील महानगरपालिकेची शाळा भाड्याच्या जागेत भरत असलयामुळे सदरील शाळा हत्तेसिंगपुरा येथील वाचनालयासाठी बांधलेल्या व सध्या रिकामी असलेल्या ईमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०४/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या वॉर्ड क्र.४५ अंतर्गत करावयाच्या कामांचे लेखाशिर्ष बदलणेकरीता खालील प्रमाणे कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| वॉर्ड क्र. | कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद | सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद |
|---|---|---|
| ४५ | वॉर्ड क्र.४५ मधील लिंगायत स्मशानभूमी विकसित करणे - रू.५.०० लक्ष (पृष्ठ क्र.११७) | एन-११ येथील मनपा शाळेजवळील सभागृहाच्या परिसराचे सौंदर्यीकरण करणे-रू.५.०० लक्ष |
| ४५ | वॉर्ड क्र.४५ हडको एन –११ स्मशानभुमी विकसित करणे - रू.४.०० लक्ष (पृष्ठ क्र.११७) | एन – ११ येथील मनपा शाळेच्या परिसरातील सभागृहाचे सौंदर्यीकरण करणे - रू.४.०० लक्ष |

वर दर्शविल्यानुसार सुधारीत कामांसाठी अर्थसंकल्पात तरतुद वळती करण्यात यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : भाऊसाहेब ताठे अनुमोदक : श्री.राजु शिंदे, श्री.भगवान घडामोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या वॉर्ड क्र.४५ अंतर्गत करावयाच्या कामांचे लेखाशिर्ष बदलणेकरीता खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेल्या कामास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

| वॉर्ड क्र. | कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद | सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद |
|---|---|---|
| ४५ | वॉर्ड क्र.४५ मधील लिंगायत स्मशानभूमी विकसित करणे - रू.५.०० लक्ष (पृष्ठ क्र.११७) | एन-११ येथील मनपा शाळेजवळील सभागृहाच्या परिसराचे सौंदर्यीकरण करणे-रू.५.०० लक्ष |
| ४५ | वॉर्ड क्र.४५ हडको एन –११ स्मशानभुमी विकसित करणे - रू.४.०० लक्ष (पृष्ठ क्र.११७) | एन – ११ येथील मनपा शाळेच्या परिसरातील सभागृहाचे सौंदर्यीकरण करणे - रू.४.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०५/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२७ मधील फुलेनगर भागात बहुउद्देशिय हॉल बांधणे. या कामासाठी सन २००४-०५ चे अर्थसंकल्पात रू.०५.०० लक्ष (पाच लक्ष) तरतुद ठेवण्यात आलेली आहे. तरी यात अंशत: बदल करून सदरील आर्थिक तरतुद रू.०५.०० (पाच लक्ष) एकनाथ नगर परिसरात याच कामासाठी वापरण्यात यावा, करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.प्रकाश निकाळजे          अनुमोदक : श्री.सुनिल मगरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२७ मधील फुलेनगर भागात बहुउद्देशिय हॉल बांधणे, या कामासाठी सन २००४-०५ चे अर्थसंकल्पात ठेवण्यात आलेली तरतुद रू.०५.०० लक्ष (पाच लक्ष) ही रक्कम एकनाथ नगर परिसरात याच कामासाठी वापरण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०६/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००४-२००५ या वर्षाचे अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक -१५४ अ.क्र.६४ नुसार प्रभाग क्र.४९ एन –७ जी.पी. येथे जलवाहिनी टाकण्यासाठी रक्कम रू.३,००,०००/- तरतुद ठेवण्यात आलेली आहे. सदरील काम करून वार्डातील इतरत्र पाणीपुरवठ्याचे कामासाठी सदर तरतुद वापरण्याच्या मंजुरीसाठी ऐनवेळचा प्रस्ताव ठेवण्यात यावा ही विनंती.

सुचक : श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे          अनुमोदक : सौ.साधना सुरडकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००४-२००५ या वर्षाचे अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक -१५४ अ.क्र.६४ नुसार प्रभाग क्र.४९ एन –७ जी.पी. येथे जलवाहिनी टाकण्यासाठी रक्कम रू.३,००,०००/- ठेवण्यात आलेली तरतुद सदरील काम करून वार्डातील इतरत्र पाणीपुरवठ्याचे कामासाठी सदर तरतुद वापरण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०७/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात प्रभाग क्र.२२ मधील खालील महत्वाच्या कामांकरिता लेखाशीर्ष बदलण्यात यावे.

१. प्र.क्र.२२ जयनगर येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे, या ऐवजी जयनगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. रू. १.५० लाख

२. प्र.क्र.२२ जुनी एस.बी.एच कॉलनी येथील खुली जागा संरक्षित करणे या ऐवजी प्र.क्र.२२ मध्ये नवी एस.बी.एच. कॉलनी येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. रू.२ लाख

३. सहकारनगर येथे सार्वजनिक लहान जलकुंभ बांधणे या ऐवजी वॉर्ड क्र.२२ येथे विविध ठिकाणी डांबरीकरणे करणे. रू.२ लाख

४. प्रभाग क्र.२२ जुनी एस.बी.एच. कॉलनी येथील नविन ड्रेनेज लाईन टाकणे या ऐवजी जीवन सोसायटी,भरतनगर येथील डांबरीकरण करणे. रू.१ लाख

सुचक : सौ.विजया रहाटकर          अनुमोदक : सौ.साधना सुरडकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात प्रभाग क्र.२२ मधील खालील महत्वाच्या कामांकरिता लेखाशीर्ष बदलण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

१. प्र.क्र.२२ जयनगर येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे, या ऐवजी जयनगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. रू. १.५० लाख

२. प्र.क्र.२२ जुनी एस.बी.एच कॉलनी येथील खुली जागा संरक्षित करणे या ऐवजी प्र.क्र.२२ मध्ये नवी एस.बी.एच. कॉलनी येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. रू.२ लाख

३. सहकारनगर येथे सार्वजनिक लहान जलकुंभ बांधणे या ऐवजी वॉर्ड क्र.२२ येथे विविध ठिकाणी डांबरीकरणे करणे. रू.२ लाख

४. प्रभाग क्र.२२ जुनी एस.बी.एच. कॉलनी येथील नविन ड्रेनेज लाईन टाकणे या ऐवजी जीवन सोसायटी,भरतनगर येथील डांबरीकरण करणे. रू.१ लाख

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०८/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या प्रभागातील कामाचे अर्थसंकल्प २००४-२००५ मधील शिर्षक बदलणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पातील पान क्र.१७० काम अनु.क्र.५२ शास्त्रीनगर महानगरपालिका शाळा ते जवाहर नगर पो.स्टेशन पर्यंत साईड ड्रेन बांधणे या कामासाठी ५ लाख तरतुद करण्यात आली आहे. परंतु या कामापेक्षा या भागातील म्हणजे शास्त्रीनगर या भागातील रस्त्यांचे रूंदीकरणे व मजबुतीकरण करणे अधिक आवश्यक आहे. तरी सदरील कामाचे शिर्षक शास्त्रीनगर येथील व भगवती कॉलनी येथील रस्त्याचे रूंदीकरण व मजबुतीकरण -५ लाख असे करण्यात यावे. व आजच्या सभेत हा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करावा.

सुचक : सौ.डॉ.आशा बिनवडे

अनुमोदक : श्रीमती जयश्री किवळेकर, सौ.ॲड.सुवर्णा चंद्रात्रे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००४-२००५ मधील अर्थसंकल्पातील पान क्र.१७० काम अनु.क्र.५२ शास्त्रीनगर महानगरपालिका शाळा ते जवाहर नगर पो.स्टेशन पर्यंत साईड ड्रेन बांधणे या कामासाठी ५ लाख करण्यात आलेली तरतुद ही या भागातील शास्त्रीनगर, भगवतीकॉलनी भागातील रस्त्यांचे रूंदीकरण व मजबुतीकरण करणेसाठी सदरील कामाचे शिर्षक बदलणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०९/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वसाधारण सभा दिनांक १९.०६.२००४ मधील विषय क्र.३३२/५ अन्वये जकात दर अनुसूची 'ओ ' मध्ये गॅस,पेट्रोल,डिझेल व गृह उपयोगी वस्तुंवर वाढ न करता त्या प्रस्तावासोबत जोडलेल्या विवरणा प्रमाणे सर्व बाबीवर प्रस्तावित जकात वाढ करण्यास मंजुरी दिलेली आहे. याचा परिणाम म्हणून दोन मोठे उद्योग समुहांनी आपले उद्योग (कारखाने) या शहरातून स्थलांतर करण्याचा निर्णय घेतलेला आहे व इतरही काही कारखाने स्थलांतराच्या मार्गावर आहेत. त्याच प्रमाणे शहरातील व्यापारी व कारखानदार यांचा तीव्र विरोध आहे. जकात वाढीपासून जितके उत्पन्न मिळणार आहे किंबहुना त्यापेक्षा जास्त महसूल हा उद्योगधंदे स्थलांतरामुळे बुडणार (नुकसान ) आहे. शिवाय शहरातील रोजगार, उत्पादन व इतर सामाजिक घटकांवर विपरित परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे तुर्त केलेली जकात वाढ रद्द करणे योग्य ठरेल. यासाठी सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.१ (र) ला अधिन राहुन माहे ऑगस्ट २००४ मध्ये किंवा ऑगस्ट २००४ मध्ये

सभेचे कामकाज झाले नाही तर त्यानंतरच्या सभेत प्रस्ताव क्र.३३२/५ दिनांक १९.०६.२००४ रोजीचा ठराव रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव ठेवणेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.किशनचंद तनवाणी,डॉ.भागवत कराड, श्री.भगवान घडमोडे

अनुमोदक : सौ.साधना सुरडकर, श्री.नंदकुमार घोडेले, श्री.जयवंत ओक, श्री.प्रशांत देसरडा, श्री.भाऊसाहेब ताठे,श्री.नंदु फुलारी, श्री.प्रल्हाद निमगांवकर,श्री.आनंद तांदुळवाडीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सर्वसाधारण सभा दिनांक १९.०६.२००४ ठराव क्र.३३२/५ अन्वये जकात अनुसूची 'ओ ' गॅस, पेट्रोल, डीझेल व गृहउपयोगी वस्तु सोडून त्या प्रस्तावासोबत जोडलेल्या विवरणाप्रमाणे जकात वाढ केलेली आहे.

सदर जकात वाढ रद्द करण्यासाठी सभा कामकाज नियमावलीमध्ये नियम क्र.१ (र) प्रमाणे ठराव क्र.३३२/५ रद्द करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१०/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जालना रोड ते टाकलकर सोसायटी मार्गे इंदिरानगर ६० फुट विकास योजना रस्त्याचे भूसंपादन प्रकरण चालु आहे. औरंगाबाद शहराची जुन्या हद्दीतील १९७५ ला मंजुर झालेली विकास योजना सुधारित करण्यात आली असून सुधारित विकास योजना शासनाने १८ एप्रिल २००१ रोजी मंजुर केली असुन आता अस्तित्वात व शासनाने मंजूर केलेल्या सुधारित विकास योजनेत जालना रोड मार्गे इंदिरानगर ते टाकलकर सोसायटी या ६० फुट रूंद रस्त्याची आखणी लक्ष्मी कॉलनीच्या ठिकाणी पुर्वेस अल्पशी आखणीय बदल झालेली आहे.

तरी आता २००२ मध्ये शासनाने मंजुर केलेल्या सुधारित विकास योजना प्रमाणे ६० फुट रूंद जालना रोड मार्गे इंदिरानगर ते टाकलकर सोसायटी या रस्त्याचे भु-संपादन करण्यात यावे.

सुचक : श्री.अ.कदीर मौलाना सय्यद, श्री.मीर हिदायत अली    अनुमोदक : श्री.किशोर तुलसीबागवाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाने मंजुर केलेल्या व आता अस्तित्वात असलेल्या सुधारित विकास योजना प्रमाणे ६० फुट रूंद जालना रोड मार्गे इंदिरानगर ते टाकलकर सोसायटी या रस्त्याचे आखणीत झालेल्या बदलाप्रमाणे भु-संपादन करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४११/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संत गाडगे महाराज यांनी स्वच्छतेसाठी व समाजातील अंधश्रध्दा निर्मुलनासाठी कार्य केले आहे. त्यामुळे त्यांचा पुर्णाकृती पुतळा महानगरपालिका प्रांगणात बसविण्यात यावा.

सुचक : रतनकुमार पंडागळे,

अनुमोदक : श्री.माणिक साळवे, श्री.भगवान घडमोडे, श्री.काशिनाथराव कोकाटे, श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.संजय सिरसाठ,श्री.प्रकाश निकाळजे,श्री.नंदु फुलारी,श्री.राजु शिंदे,श्री.भगवान रगडे, श्री.मीर हिदायत अली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत गाडगे महाराज यांनी स्वच्छतेसाठी व समाजातील अंधश्रध्दा निर्मुलनासाठी कार्य केलेले असल्यामूळे त्यांचा पुर्णाकृती पुतळा महानगरपालिका प्रांगणात बसविण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१२/१८ :**

सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात पान क्र.१७४ अ.क्र.६ अन्वये प्रभाग क्र.१० येथील धनगर गल्ली येथे गटार दुरूस्तीचे कामासाठी र.रू.एक लाखाची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. तथापि

त्याऐवजी प्रभाग क्र.१० येथे धनगर गल्लीमध्ये ड्रेनेज लाईनचे काम करणेसाठी सदरील तरतुद वळती करण्यांत यावी.

करिता प्रस्ताव विचारार्थ तथापि मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.भाऊसाहेब वाघ अनुमोदक : सौ.साधना सुरडकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात पान क्र.१७४ अ.क्र.६ प्रभाग क्र.१० येथील धनगर गल्ली येथे गटार दुरूस्तीचे कामासाठी र.रू.एक लाखाची ठेवण्यात आलेली तरतुद प्रभाग क्र.१० येथे धनगर गल्लीमध्ये ड्रेनेज लाईनचे काम करणेसाठी वळती करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

(याच वेळी मा.महापौर डायससमोर स.सभासद जाऊन मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकावयास येत नाही.)

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद